**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १४७ वा | शुक्रवार, दि. ०९ जानेवारी २०२६ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ‘आपलं मत कुणाला? अजित दादांच्या घड्याळाला!’

## प्रभाग ४ मधील मतदारांचा कल स्पष्ट - संतोष पवार यांचा विश्वास



### सुशील बंदपट्टे यांचा ‘होम टू होम’ प्रचार; नागरिकांशी थेट संवादातून प्रश्नांवर ग्वाही




**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या प्रचाराला वेग आला असून, ‘आपलं मत कुणाला? अजित दादांच्या घड्याळाला!’ असा मतप्रवाह प्रभागातील मतदारांमध्ये दिसून येत असल्याचा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी व्यक्त केला आहे.

प्रभाग क्रमांक ४ मधील युतीचे उमेदवार सीए सुशील बंदपट्टे यांनी ह्यहोम टू होमह्ण प्रचारावर भर देत नागरिकांशी थेट संवाद साधण्याची भूमिका घेतली आहे. त्यांनी न्यू बुधवार पेठ परिसरात घरोघरी भेटी देत मतदारांच्या समस्या जाणून घेतल्या. गेल्या तीन ते चार दिवसांपासून न्यू बुधवार पेठ, मराठा वस्ती, जम्मा चाळ, श्रीराम नगर आदी भागांमध्ये त्यांचा सघन प्रचार सुरू आहे.

या भेटीदरम्यान नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा तुटवडा, रस्त्यांची दुरवस्था, ड्रेनेज लाईनचे प्रश्न, घंटागाडी वेळेवर न येणे, परिसरातील अस्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांबाबत नाराजी व्यक्त केली. काही भागांत तर विद्यमान नगरसेवक नागरिकांपर्यंत पोहोचलेच नसल्याच्या तक्रारीही नागरिकांनी केल्याचे बंदपट्टे यांनी सांगितले.

अनेक वर्षांपासून या समस्या कायम असूनही त्यावर प्रभावी उपाययोजना झाल्या नसल्याची भावना मतदारांमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर पॅनलच्या वतीने सर्व प्रश्नांवर ठोस आणि प्रभावी उपाययोजना करून त्यांचे टप्प्याटप्प्याने निराकरण करण्याची ग्वाही देण्यात आल्याचे बंदपट्टे यांनी स्पष्ट केले. ड्रेनेज लाईन दुरुस्ती, नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्थेचे बळकटीकरण, अंतर्गत रस्त्यांची कामे तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याला प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

‘होम टू होम’ प्रचारामुळे मतदारांशी थेट संवाद साधता येत असून, त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि प्राधान्यक्रम समजून घेण्यास मोठी मदत होत असल्याचे बंदपट्टे यांनी सांगितले. या पद्धतीच्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, प्रभाग ४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) उमेदवारांच्या बाजूने वातावरण तयार होत असल्याचे चित्र आहे.

यावेळी प्रभाग क्रमांक ४ मधील शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस युतीचे अधिकृत उमेदवार अ. कविता चंदनशिवे, ब. सीए सुशील बंदपट्टे, क. सारिकाताई फुटाणे, ड. विश्वनाथ बिडवे यांच्यासह कार्यकर्ते आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित कार्यकर्त्यांनी प्रचारात सक्रिय सहभाग घेत मतदारांशी संवाद साधला.

एकंदरीत, प्रभाग क्रमांक ४ मध्ये ‘घड्याळा’च्या बाजूने मतदारांचा कल वाढत असून, महायुतीच्या उमेदवारांना मिळणारा प्रतिसाद पाहता निवडणूक प्रचाराला निर्णायक वळण मिळत असल्याचे राजकीय जाणकारांकडून बोलले जात आहे.

## कस्तुरबा भाजी मंडईच्या दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर

### व्यापाऱ्यांसाठी निवारा केंद्र उभारण्याचे आश्वासन

### प्रचारात नव्या मुद्द्यांवर चर्चा; प्रभाग ४ मधील नागरिकांनी उपस्थित केले प्रश्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूर महापालिकेअंतर्गत येणाऱ्या शहरातील सर्वात जुन्या कस्तुरबा भाजी मंडईची सध्या मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून, येथे भाजी विक्रेते तसेच खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर कस्तुरबा मंडईची तातडीने दुरुस्ती करणे, तसेच बाजारपेठेत येणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी स्वतंत्र निवारा केंद्र उभारण्याचे काम प्राधान्याने केले जाईल, असे आश्वासन प्रभाग क्रमांक ४ मधील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार सुशील बंदपट्टे यांनी दिले.

निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने सुशील बंदपट्टे यांनी वडार गल्ली, स्लीपर कॉलनी, नीला नगर, गौरा नगर, नागणे देशमुख अपार्टमेंट आणि सम्राट चौक या



परिसरातून पदयात्रा काढली. या पदयात्रेदरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधण्यात आला. यावेळी कविता आनंद चंदनशिवे, सारिका फुटाणे, विश्वनाथ बिडवे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पदयात्रेदरम्यान नागरिकांनी कस्तुरबा भाजी मंडईतील गाळ्यांची झालेली दुरवस्था, अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची गैरसोय, स्वच्छतागृहांचा अभाव तसेच पावसाळ्यात व उन्हाळ्यात व्यापाऱ्यांना आणि ग्राहकांना भेडसावणाऱ्या अडचणी याबाबत प्रश्न उपस्थित केले. शहरातील सर्वात जुनी आणि महत्त्वाची असलेली ही भाजी मंडई दुर्लक्षित असल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

यावर प्रतिक्रिया देताना सुशील बंदपट्टे म्हणाले, ‘प्रभाग क्रमांक ४ हा केवळ लोकवस्तीचा भाग नसून, तो एक महत्त्वाचा व्यापारी परिसरदेखील आहे. त्यामुळे या भागात मुंबईच्या धर्तीवर व्यापाऱ्यांसाठी सुसज्ज निवारा केंद्र, स्वच्छतागृहे आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहील. कस्तुरबा भाजी मंडईसाठी स्वतंत्र विशेष निधी आणून तेथे व्यवस्थित ओटे, भाजी धुण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था, पाणीपुरवठा आणि स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात येईल.’

याचबरोबर वडार गल्ली व परिसरातील रस्ते, पथदिवे, ड्रेनेज, पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधांवरही सविस्तर चर्चा झाली. या चर्चेत परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला. नागरिकांनी मांडलेल्या सूचनांच्या आधारे विकासकामांचे नियोजन करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

एकूणच, प्रचाराच्या निमित्ताने झालेल्या या पदयात्रेमुळे प्रभाग ४ मधील नागरिकांचे दैनंदिन प्रश्न, विशेषतः व्यापारी व भाजी विक्रेत्यांशी संबंधित समस्या ऐरणीवर आल्या असून, त्यावर ठोस उपाययोजना करण्याचा निर्धार उमेदवारांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

## इंद्रजित पवार यांचा वाढदिवस लोकोपयोगी व सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा

### शाळकरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शेतकऱ्यांना औजारे; पत्रकारांचा सन्मान

**उत्तर सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** भारतीय जनता पक्षाचे जिल्हा कोषाध्यक्ष इंद्रजित पवार यांचा वाढदिवस उत्तर सोलापूर तालुक्यात विविध लोकोपयोगी, सामाजिक आणि क्रीडा उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून समाजातील विविध घटकांसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांमुळे या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. त्यानंतर माडी येथील सार्वजनिक व धार्मिक ठिकाणी नागरिकांना



बसण्यासाठी बाकड्यांचे वितरण करण्यात आले. शेती क्षेत्राला चालना देण्यासाठी शेतकरी गटांना शेतीसाठी उपयुक्त साहित्य व औजारे देण्यात आली.

वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सरपंच क्रिकेट लीग स्पर्धेला विशेष प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत जीपी वॉरियर्स क्रिकेट संघाने प्रथम पारितोषिक पटकाविले, घातक क्रिकेट संघाने द्वितीय, तर एस. राजे क्रिकेट संघाने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

याशिवाय सोलापूर येथील महिला भगिनींनी इंद्रजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांची यान्याची तुला करून जमा झालेले सर्व धान्य सोलापूर येथील श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यास यांना सुपूर्द करण्यात आले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

बाणेगाव येथे भाजप ओबीसी मोर्चाचे तालुकाध्यक्ष केदार तोडकरी यांच्या वतीने इंद्रजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ व साडी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच पत्रकार दिनाचे औचित्य साधून उत्तर सोलापूर तालुक्यातील पत्रकारांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या सर्व कार्यक्रमांना भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अविनाश मार्तंडे, सोसायटी चेअरमन बाबासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते शिवाजी सोनार, काशीनाथ कदम, भाजप तालुकाध्यक्ष संभाजी दडे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विनायक सुतार, किसान मोर्चा अध्यक्ष नागेश ननवरे, गणेश पवार, बाणेगावचे सरपंच पिंटू जाधव, कारंबा गावचे सरपंच तुकाराम चव्हाण, दीपक डांगे, गुळवंचीचे सरपंच सुनील जाधव, नरोटेवाडीचे सरपंच उमेश भगत, कमलाकर माने, दत्तात्रय पवार, अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष अझर शेख, उत्तर युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अमोल सुतार, महेश पेंडपाले, युवराज पवार, महादेव जाधव, विश्वनाथ जगताप यांच्यासह तालुक्यातील भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याची ही परंपरा प्रेरणादायी असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## सोलापूर महानगरपालिका मतदान प्रक्रिया प्रशिक्षण यशस्वी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर आज मतदान प्रक्रिया कशी राबविण्यात येणार आहे, याबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सखोल प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रशिक्षण हुतात्मा स्मृती मंदिर व द हेरिटेज मंगल कार्यालय येथे पार पडले.या प्रशिक्षण कार्यक्रमास सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी मतदान प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करण्याचे आवाहन केले.प्रशिक्षणामध्ये मतदान केंद्र उभारणी, मतदान केंद्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, मतदारांची ओळख तपासणी, ईव्हीएम व मशीनचा योग्य वापर, मॉक पोल प्रक्रिया, मतदानाच्या दिवशी अनुसरण्यात येणाऱ्या नियमावली, तसेच आकस्मिक परिस्थितीत घ्यावयाच्या

(पान 2 वर..)

## ‘यंदा महापौर धनुष्यबाणाचाच!’

### शिवसेनेचा दावा; वचननाम्यात मूलभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य

### भाजपकडून दहशतीच्या राजकारणाचा आरोप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, ‘यंदा महापौर धनुष्यबाणाचाच होणार’ असा ठाम दावा शिवसेना (एकनाथ शिंदे गट) कडून करण्यात आला आहे. गेल्या साठ वर्षांत कधीही न पाहिलेली अशी भयावह राजकीय परिस्थिती सध्या शहरात निर्माण झाली असून, भाजपकडून दहशतीचा वापर करून निवडणुका घेतल्या जात असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी केला.

निवडणूक जाहीर झाल्यापासून उमेदवारी अर्ज भरण्याच्या टप्प्यापर्यंत सर्वत्र भीतीचे वातावरण पसरवले जात असून, सामान्य नागरिकांसह कार्यकर्त्यांनाही दबावाखाली ठेवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ‘सोलापूरच्या इतिहासात इतके भयावह वातावरण कधीच नव्हते,‘ असे स्पष्ट शब्दांत शिंदे म्हणाले. शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांची आघाडी महापालिकेत सत्तेत आल्यानंतर सोलापूर शहर दहशतमुक्त करण्याचा ठाम निर्धार शिवसेनेच्या आगामी वचननाम्यात करण्यात आला आहे. दहशतीच्या राजकारणाला सोलापूरकर कंटाळले असून,



भयमुक्त वातावरणात जगण्याचा हक्क नागरिकांना मिळालाच पाहिजे, अशी भूमिका शिवसेनेने मांडली आहे.

शिवसेना लवकरच आपला अधिकृत जाहीरनामा प्रसिद्ध करणार असून, त्यामध्ये नागरिकांच्या मूलभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार असल्याचे अमोल शिंदे यांनी स्पष्ट केले. आगामी पाच वर्षांच्या महापालिका कारभारात केवळ राजकारण नव्हे, तर प्रत्यक्ष जनहिताचे काम केले जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शहरातील अनेक वर्षांपासून रखडलेला सुरळीत व पुरेसा पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, ड्रेनेज व्यवस्थेतील त्रुटी, अस्वच्छता, आरोग्य सेवा आणि नागरी सुविधा यावर ठोस व कालबद्ध उपाययोजना करण्याची हमी शिवसेनेच्या वचननाम्यात दिली जाणार आहे.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या या आक्रमक भूमिकेमुळे शहरातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत असून, नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांवर आधारित विकासात्मक आणि लोकाभिमुख राजकारण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

आघाडी सरकार सत्तेत आल्यानंतर शहराचा कारभार पारदर्शक, भयमुक्त आणि जनतेच्या हिताचा राहील, असा विश्वास व्यक्त करत ‘सोलापूरकर यंदा धनुष्यबाणालाच साथ देतील,‘ असा दावा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

## महाविकास आघाडीचा ‘शहर विकास जाहीरनामा’ प्रकाशन

### कामगार, कष्टकरी व सामान्य नागरिकांच्या हस्ते जाहीरनामा; ‘शहर प्रथम’ भूमिकेचा निर्धार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने पुढील पाच वर्षांसाठीचा दूरदृष्टीपूर्ण ‘शहर विकास जाहीरनामा - २०२६’ अधिकृतरित्या जाहीर केला. हा प्रकाशन सोहळा हॉटेल सूर्या, मुरारजी पेठ, सोलापूर येथे मोठ्या उत्साहात आणि जनसहभागातून पार पडला. या जाहीरनाम्याच्या माध्यमातून सोलापूर शहराच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि पायाभूत विकासाचा सविस्तर आराखडा नागरिकांसमोर मांडण्यात आला आहे. ‘चला एकत्र लढूया सोलापूरच्या नवनिर्मितीसाठी, परिवर्तन घडवूया’ आणि ‘जनसेवेच्या माध्यमातून नवी दिशा - सोलापूर शहराची सर्वांगीण प्रगती’ हा जाहीरनाम्याचा मुख्य संदेश आहे.

**कष्टकरी वर्गाच्या हस्ते जाहीरनामा प्रकाशन**

या जाहीरनाम्याचे वैशिष्ट्य म्हणजे, शहराच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या बिडी कामगार, यंत्रमाग कामगार, बांधकाम व बिगारी कामगार, घरकाम करणाऱ्या



महिला, रिक्षाचालक आणि कष्टकरी बांधवांच्या हस्ते जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. यामध्ये बिडी कामगार नागमणी गरदास, नीलावती कोटा, घरकाम करणाऱ्या निर्मला माढेकर, यंत्रमाग कामगार दुबया श्रीराम, परमेश्वर बंडा, बांधकाम कामगार भारत तल्लारे, श्रीनिवास म्हेत्रे, नागनाथ शावणे, सुभाष म्हेत्रे तसेच रिक्षाचालक शिवाजी साळुंखे यांचा सहभाग होता.

या प्रकाशन सोहळ्यास खासदार प्रणिती शिंदे, कम्युनिस्ट पक्षाचे माजी आमदार कॉ. नरसय्या आडम, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, काँग्रेस शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) शहराध्यक्ष महेश गादेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख अजय दासरी, कम्युनिस्ट पक्षाचे युसुफ शेख मेजर, काँग्रेस प्रवक्ते अशोक निंबर्गी, प्रताप चव्हाण, दत्ता गणेशकर यांच्यासह महाविकास आघाडीतील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**‘न्याय, विकास आणि समृद्धी’ ही त्रिसूत्री**

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी स्पष्ट केले की, हा जाहीरनामा न्याय, विकास आणि समृद्धी या त्रिसूत्रीवर आधारित असून, सोलापूरची बहुभाषिक, बहुसांस्कृतिक आणि धर्मनिरपेक्ष ओळख जपत ह्यशहर प्रथमह्ण या भूमिकेतून तयार करण्यात आला आहे.

**जाहीरनाम्यातील ठळक विकासदृष्टी**

जाहीरनाम्यात एक दिवसाआड शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापनाचे सुसूत्रीकरण, प्रदूषणमुक्त व हरित सोलापूरसाठी ठोस उपाय, खड्डेमुक्त व टिकाऊ रस्ते, उद्याने व हिरव्या जागांचे संवर्धन, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे आधुनिकीकरण आणि सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

याचबरोबर सक्षम SMT परिवहन व्यवस्था उभारून कामगार, विद्यार्थी, महिला, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ आणि परवडणारी बससेवा देण्याचा संकल्प जाहीर करण्यात आला आहे.

**महिलांसाठी ऐतिहासिक निर्णय**

महिलांना केंद्रस्थानी ठेवत शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी शिक्षण, नोकरी व दैनंदिन प्रवासाकरिता रटळ बस प्रवास पूर्णतः मोफत करण्याची महत्त्वाकांक्षी घोषणा करण्यात आली. महिला सुरक्षा, आरोग्य व सक्षमीकरणासाठी विशेष योजना राबवण्यावर भर देण्यात आला आहे.

**शिक्षण, आरोग्य आणि रोजगारावर भर**

महापालिकेच्या शाळा अद्ययावत करणे, मराठी शाळांसाठी विशेष निधी, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची उभारणी, ड्रेनेज व जलवाहिन्यांचे विस्तारीकरण, पार्किंग व्यवस्था, सार्वजनिक स्वच्छतागृहे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, आयटी पार्कद्वारे रोजगारनिर्मिती अशा दूरगामी योजनांचा जाहीरनाम्यात समावेश आहे.

**पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचा निर्धार**

डिजिटल व आधुनिक प्रशासन प्रणालीद्वारे पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त आणि गतिमान स्मार्ट प्रशासन देण्याचा निर्धार महाविकास आघाडीने व्यक्त केला आहे.येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांना मोठ्या बहुमताने विजयी करण्याचे आवाहन उपस्थित सर्व नेत्यांनी सोलापूरकर मतदारांना केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अँड केशव इंगळे आणि तिरुपती परकीपंडला यांनी सर्व पत्रकार बांधवांचे आभार मानले.

## संपादकीय

# आर्थिक सुधारणांचे नवे पर्व

कर, कामगार, जीएसटी आणि ग्रामीण रोजगार क्षेत्रातील सुधारणा करत 2025 मध्ये भारताने परिणामाधारित आर्थिक प्रशासनाची ठोस दिशा निश्चित केली. समावेशक विकास, व्यवसाय सुलभता आणि भविष्यसज्ज अर्थव्यवस्थेची पायाभरणी करणाऱ्या या सुधारणांचे सविस्तर आढावा. सन 2025 मधील आर्थिक सुधारणा परिणामाधारित प्रशासन, प्रणाली सुलभीकरण आणि आर्थिक वाढ, समावेशकता व व्यवसाय सुलभतेला चालना देण्यावर केंद्रित होत्या. कामगार सुधारणांतर्गत 29 कायदे चार कामगार संहितांमध्ये एकत्र करण्यात आले असून, सामाजिक सुरक्षा आणि कार्यस्थळ सुरक्षिततेचा विस्तार करण्यात आला आहे. 2025 हे वर्ष भारताच्या आर्थिक प्रशासनासाठी एक महत्त्वाचे वळण ठरले आहे. या काळातील आर्थिक सुधारणा केवळ कायदे वाढविण्यापुरत्या मर्यादित न राहता प्रत्यक्ष परिणाम देणाऱ्या प्रशासनावर केंद्रित राहिल्या. करप्रणाली, कामगार कायदे, जीएसटी, ग्रामीण रोजगार, एमएसएमई आणि निर्यात क्षेत्रात सुलभीकरण, पारदर्शकता आणि विश्वास निर्माण करण्यावर भर देण्यात आला. सरकारचा भर 'ईज ऑफ लिव्हिंग', 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' आणि समावेशक विकास यावर राहिला. युवक, महिला, लघुउद्योग, स्टार्टअप्स आणि ग्रामीण घटकांना सक्षम करणारी धोरणे राबविण्यात आली. या सर्व सुधारणांमुळे दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य आणि भविष्यसज्ज भारताची पायाभरणी झाली आहे.

उत्पन्न कर सुधारणा : मध्यमवर्गाला दिलासाकेंद्रीय अर्थसंकल्प 2025–26 मध्ये थेट करप्रणालीत मोठा दिलासा देण्यात आला. नव्या करप्रणालीअंतर्गत वार्षिक 12 लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले असून, वेतनदारांसाठी ही मर्यादा मानक वजावटीमुळे 12.75 लाखांपर्यंत जाते. त्यामुळे कोट्यवधी मध्यमवर्गीय कुटुंबांच्या हाती अधिक खर्चयोग्य उत्पन्न राहणार आहे. जुलै 2024 मध्ये 1961 च्या उत्पन्नकर कायद्याच्या जागी नवीन उत्पन्नकर कायदा 2025 लागू करण्याची घोषणा करण्यात आली. या कायद्याचा उद्देश भाषा सोपी करणे, कालबाह्य तरतुदी काढून टाकणे आणि कायद्याची रचना अधिक स्पष्ट करणे हा आहे. करदरात कोणताही बदल न करता करप्रणाली अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्यात आली आहे. या कायद्यात आर्थिक वर्ष ही एकच संकल्पना स्वीकारण्यात आली असून, आधीच्या असेसमेंट इअर आणि प्रिव्हियस इअरमधील गोंधळ दूर झाला आहे. डिजिटल आणि फेसलेस करप्रशासन, एकत्रित टीडीएस तरतुदी आणि तंत्रज्ञानाधारित यंत्रणा यामुळे वादविवाद आणि खटल्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

कामगार सुधारणा : चार संहितांमधून एकसंध व्यवस्था

सरकारने 29 कामगार कायदे एकत्र करून चार कामगार संहिता लागू केल्या आहेत. यामध्ये वेतन संहिता, औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता आणि व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य संहिता यांचा समावेश आहे. या सुधारणांमुळे वेतनाची एकसमान व्याख्या, किमान वेतनाची हमी, औद्योगिक वादांचे सुलभीकरण, तसेच असंघटित, गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांनाही सामाजिक सुरक्षेचे कवच मिळाले आहे. सुमारे दहा लाख गिग कामगारांना वार्षिक सामाजिक सुरक्षा लाभ मिळणार आहे. महिलांसाठी प्रसूती रजा, सुरक्षित कार्यस्थळ आणि सामाजिक संरक्षण अधिक मजबूत झाले आहे. ग्रामीण रोजगार सुधारणा : 125 दिवसांची हमी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या जागी विकसित भारत रोजगार व आजीविका हमी (ग्रामीण) कायदा 2025 लागू करण्यात आला आहे. या कायद्यानुसार प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला वर्षाला 125 दिवसांचा हमखास रोजगार देण्यात येणार आहे. आठवड्यात किंवा कमाल 15 दिवसांत मजुरी देण्याची तरतूद, शेती व ग्रामीण रोजगार यांचा समन्वय, जलसंधारण, ग्रामीण पायाभूत सुविधा आणि हवामान–सहनशील कामांवर भर देण्यात आला आहे. ग्रामसभांच्या माध्यमातून नियोजन करून कामे राष्ट्रीय डिजिटल प्लॅटफॉर्मशी जोडण्यात आली आहेत. एमएसएमई आणि उद्योग सुलभीकरण सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांची व्याख्या वाढविण्यात आली आहे. गुंतवणूक आणि उलाढाल मर्यादा वाढवल्यामुळे उद्योग विस्ताराला चालना मिळणार आहे. सूक्ष्म उद्योगांसाठी गुंतवणूक मर्यादा 2.5 कोटी, लघू उद्योगांसाठी 25 कोटी आणि मध्यम उद्योगांसाठी 125 कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. एमएसएमईसाठी कर्ज हमी मर्यादा दुप्पट करण्यात आली असून, गुणवत्ता नियंत्रण आदेश टप्प्याटप्प्याने लागू करून लघुउद्योगांना सवलती देण्यात आल्या आहेत. जीएसटी 2.0 : सोपी करप्रणाली नव्या पिढीतील जीएसटी सुधारणांअंतर्गत दोनच करस्लॅब (5 टक्के आणि 18 टक्के) लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे वर्गीकरणातील गोंधळ, अनुपालन खर्च आणि वाद कमी होणार आहेत. जीवनावश्यक वस्तूंवरील कर कमी झाल्याने महागाईचा भार कमी होण्यास मदत झाली आहे. या सुधारणांमुळे जीएसटी करदात्यांची संख्या 1.5 कोटींपेक्षा अधिक झाली असून, 2024–25 मध्ये जीएसटी महसूल 22.08 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. निर्यात प्रोत्साहन मिशन : एमएसएमईसाठी संधी केंद्र सरकारने 25,060 कोटी रुपयांचे निर्यात प्रोत्साहन मिशन सुरू केले आहे. या योजनेतून लघुउद्योग, नवोदित निर्यातदार आणि श्रमप्रधान क्षेत्रांना वित्तपुरवठा, गुणवत्ता प्रमाणपत्रे, ब–डिंग आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच यासाठी मदत मिळणार आहे. अपरंपरागत जिल्ह्यांमधून निर्यात वाढवणे आणि रोजगारनिर्मिती हे या मिशनचे मुख्य उद्दिष्ट आहे. परिणामाधारित प्रशासनाची दिशा 2025 मधील आर्थिक सुधारणा या केवळ धोरणात्मक बदल नसून, प्रत्यक्ष परिणाम देणाऱ्या प्रशासनाचे उदाहरण आहेत. करसुलभीकरण, कामगार संरक्षण, ग्रामीण रोजगार, एमएसएमई सक्षमीकरण आणि निर्यात वाढ यामुळे भारताची अर्थव्यवस्था अधिक मजबूत, समावेशक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होत आहे. डिजिटल प्रशासन आणि तंत्रज्ञानाधारित सुधारणांनीही 2025 मध्ये आर्थिक बदलांना वेग दिला आहे. सरकारी सेवा, अनुदाने, कर्जवितरण आणि करप्रशासन अधिकाधिक ऑनलाइन व कागदविरहित करण्यात आले. थेट लाभ हस्तांतरण, आधार–आधारित ओळख प्रणाली आणि राष्ट्रीय डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे गळती कमी झाली असून लाभार्थ्यांपर्यंत योजना थेट पोहोचू लागल्या आहेत. स्टार्टअप्स आणि नवउद्योगांसाठी नियामक सुलभीकरण, जलद मंजुरी प्रक्रिया आणि डिजिटल अनुपालन यामुळे नवकल्पनांना चालना मिळाली आहे. या सर्व उपाययोजनांमुळे भारताची अर्थव्यवस्था अधिक विश्वासार्ह, पारदर्शक आणि दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी आकर्षक बनत आहे.

# शिवरायांचं चरित्र कलंकित करणारे देशी मस्तक, विदेशी पुस्तक

**शिवराय आणि जिजामाता ह्यांचे चरित्र कलंकित करणारा विदेशी लेखक जेम्स लेन ह्याच्या वादग्रस्त पुस्तकाच्या प्रकाशकाने २३ वर्षांनी जाहीर माफी मागितली आहे. दरम्यान, "संघ– भाजप" परिवाराचा शिवचरित्राला बिघडवण्याचा सपाटा सुरूच आहे. ह्या हलकटपणाला टकमक टोक शिवभक्त कधी दाखवणार?**

मा स्वराज्य निर्मितीसाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी काय केलं? तर...

स्वराज्य क्रांती पणी लाविले,
सर्व धर्म पंथ।
महान केला राष्ट्रीयतेचा,
महाराष्ट्र धर्म॥

"भेदाभेद भ्रम अमंगल" हा संत तुकोबांचा संदेश आचरणात आणून शिवरायांनी स्वराज्य निर्मितीसाठी सर्व जाती–धमार्तील लोकांना "मावळे" म्हणून सज्ज केले. शिवरायांनी कधी जातीचा तोरा आणि धमार्चा ताठा दाखवला नाही; म्हणूनच ते सर्व "रयतेचे छत्रपती" झाले आणि काळाला पुरून उरले. असे असताना गेली काही वर्षे "संघ– भाजप"च्या अनेक गणंगांनी "शिवचरित्र" बिघडवण्याचा सपाटाचा लावलाय, तो अजूनही थांबत नाही. ताजी आगळीक "भाजप"चे केंद्रीय जलशक्तीमंत्री सी. आर. पाटील यांनी केलीय. गुजरातमध्ये "भाजप"ला मजबूत करण्याच्या कामातील नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचा "खात्रीचा नेता" अशी सी.आर. पाटील यांची ओळख आहे. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने असलेला "मराठा समाज" राज्यातील राजकारणावर आपला प्रभाव पाडतो; तशीच करामत गुजरातेत "पाटीदार समाज" करतो. सी. आर. पाटील या समाजाचे आहेत. "पाटीदार" हा गुजरातमधील प्रमुख जमीनदार आणि शेतकरी समाज आहे. "लेवा" आणि "कडवा" ह्या पाटीदारांच्या प्रमुख उपजाती आहेत. हा संघटित समाज आहे. अनेक सामाजिक संस्था आणि सांस्कृतिक केंद्रांच्या माध्यमातून त्यांचे समाज विकासाचे कार्य चालते. गुजरातेतील "लेवा पाटीदार" समाज महाराष्ट्रातील खानदेश भागात "लेवा पाटील" होतो. सुरत आणि धुळे–जळगाव पट्ट्यातील "लेवा पाटीदार" समाज व्यवसाय आणि नातेसंबंध यांनी जोडलेला आहे. सी.आर. पाटील 'गुजराती'प्रमाणेच "खानदेशी मराठी"ही सफाईने बोलतात. सुरत शहरात मराठी व लेवा पाटीदार समाज मोठ्या संख्येने आहे. तेथील जाहीर सभेत बोलताना सी. आर. पाटील नुकतेच म्हणाले,"संपूर्ण देशाला एकत्र आणण्याचं श्रेय सरदार वल्लभभाई पटेल यांना द्यायला हवं. सरदार पटेल हे पाटीदार समाजाचे होते. हेही सांगायला आनंद होतोय की, छत्रपती शिवाजी महाराज हेदेखील पाटीदार होते!"

शिवरायांना आपल्या जातीत कालवण्याचा खोटेपणा "भाजप"चा केंद्रीय मंत्री करीत असतानाच; मुंबई महानगरपालिका निवडणुकीतील वॉर्ड क्रमांक १७५ मधील "भाजप" उमेदवाराच्या सभेचा व्हिडिओ सोशल मीडियातून फिरत होता. त्यात छत्रपती शिवराय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्यांपुढे एक तरुणी अचकट विचकट हावभावात डान्स करताना दिसत होती. छत्रपती शिवरायांच्या अर्धपुतळ्यावर "पोझ"मध्ये हात ठेवून फोटो काढून घेणाऱ्या राजश्री शिरवडकर यांनाही "भाजप"ने पुन्हा उमेदवारी दिली आहे. भंडारा नगरपालिका निवडणुकीत "भाजप"च्या महिला उमेदवाराने चौकातील शिवरायांच्या पुतळ्याच्या गळ्यात "भाजप"चा गमछा आणि जिरेटोपावर "भाजप"ची टोपी चढवण्याचा आगाऊपणा केला. शिवरायांना "आग्र्याहून सुटका" प्रकरणात "लाच" देणारे ठरवणारा अभिनेता राहुल सोलापूरकर आणि इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांच्याशी दूरध्वनीवरून बोलताना शिवराय व संभाजीराजांबद्दल अवमानकारी भाषा वापरणारा प्रशांत कोरटकर हे "संघ– भाजप परिवार"शी संबंधित असावेत, हा योगायोग निश्चितच नाही.

देवेंद्र फडणवीस यांच्या "ॲक्शन प्लान"मध्ये आघाडीचे वीर असलेल्या (विधान परिषद) आमदार प्रसाद लाड यांनी, तीन वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित ऐतिहासिक वाद निर्माण करणाऱ्या बाळ गंगाधर टिळकांचे 'बाप' शोभावेत, असा पराक्रम केलाय! शिवरायांचा जन्म "शिवनेरी"वर झाला असल्याचे जगजाहीर असताना प्रसाद लाड हे "शिवरायांचा जन्म रायगडावर झाला," असं म्हणाले. टिळकांनी शिवरायांच्या जन्मतिथी बरोबरच जन्मवर्षाच्या वादाचीही चूड लावली होती. वैशाख शुद्ध द्वितीया शके १५४९ (म्हणजे ६ एप्रिल १६२७) की, फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ (म्हणजे १९ फेब्रुवारी १६३०) असा हा वाद होता. तो १०० वर्षे चालला. दरम्यान, आधी 'फाल्गुन वद्य तृतीया' ह्या तिथीवर एकमत झालं. त्यानंतर 'शिवजयंती' तिथीने करायची की तारखेने करायची, यावर वाद सुरू झाला. तो २००१ पासून 'शिवजयंती' तारखेनुसार साजरी करायची, ह्या शासकीय निर्णयाने संपला.

अर्थात, हा वादाचा घोळ केवळ तिथी– तारखेचा नव्हता! तर



शिवरायांच्या जन्मदात्याबद्दल प्रश्न निर्माण करणारा तो कुटिल, नीच, सनातनी डाव होता. तो पुणेरी ब्राह्मणी टोळक्याचा 'डार्लिंग' असणारा विदेशी संशोधक– लेखक जेम्स लेन याने उघड्यावर आणला. जी खाजगीत कुजबुज चालायची, ती त्याने 'शिवाजी : द हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' ह्या पुस्तकात आणली. जेम्स लेन हा वाहक होता. त्याच्या माध्यमातून जिजाऊ– शिवरायांच्या चरित्राला 'अफजुलखानी डंख' अट्टल 'कोब्रा' नागांनी मारला होता. ह्या हरामखोरीचा समाचार मी कठोर शब्दांत वेळीच घेतला होता. (साप्ताहिक चित्रलेखा अंक : २२ डिसेंबर २००३) त्याने अस्सल मावळे जागे झाले. 'संभाजी ब्रिगेड'च्या बॅनरखाली एकवटले आणि त्यांनी जेम्स लेनला तीन वर्षे पाहुणचार देर्णाया पुण्यातल्या 'भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थे'वर हल्ला केला. हा हल्ला समर्थनीय नव्हता. पण तो का झाला, ह्याची चिकित्सा होणे आवश्यक होते. ती झाली नाही. तेव्हा आणि त्यानंतरही शिवचरित्राची छेडछाड करण्याचे प्रकार झाले; त्या प्रत्येक वेळी मी त्याचा समाचार घेतला. त्यामुळे लोकजागृती झाली. सनातनी हरामखोरीची चिरफाड करणारे लेखन मोठ्या प्रमाणात प्रकाशित झालं. त्यामुळे छत्रपतींच्या गाद्या सांभाळणाऱ्यांनाही आपल्या जबाबदारीचं भान आल्याचं चित्र दिसू लागलं. परिणामी, जेम्स लेन ह्याचं वादग्रस्त पुस्तक प्रकाशित करणाऱ्या "ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस"च्या प्रकाशकाने, आता २३ वर्षांनी संबंधित बदनामीकारक मजकुराबद्दल उदयनराजे भोसले यांची जाहिरातीतून माफी मागितली आहे. ती न्यायप्रविष्ट प्रक्रिया असल्याने तूर्तास इतकेच.

'हर हर महादेव' आणि 'वेडात मराठे वीर दौडले सात' ह्या चित्रपटांच्या 'सिनेमॅटिक लिबर्टी' आडून होण्याऱ्या इतिहासाच्या विकृतीकरणा विरोधात साताराचे छत्रपती उदयनराजे आणि कोल्हापूरचे युवराज संभाजीराजे यांनी कठोर भूमिका घेतली होती. ती मराठेशाहीचा आब राखणारी होती. अशीच कठोर–निश्चयी भूमिका घेत दोघांनीही छत्रपती शिवरायांना "जुना–पुराना आयकॉन" ठरवणाऱ्या भगतसिंह कोश्यारी यांच्या राज्यपालपदाच्या खुचीर्खाली हकालपट्टीचे आग्रही सुरुंग लावले होते. सच्चे शिवभक्तही संतप्त झाले होते. मात्र, हा असंतोष भडकत असताना 'भाजप' नेत्यांनी तेव्हा राज्यपाल पदावर बसलेल्या कोश्यारींच्या बेतालपणा विरोधात निषेधाचे अवाक्षरही काढले नाही. उलट, तेव्हा मुंबई शहराचे 'भाजप' अध्यक्ष आणि मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी शिवरायांच्या 'आग्र्याहून सुटका'ची तुलना 'शिवसेना'मध्ये फूट पाडून सत्ताबदल घडवणाऱ्या सुरत– गुवाहटी– गोवा वारीशी केली! तर 'भाजप'चे 'राष्ट्रीय प्रवक्ते' सुधांशु त्रिवेदी यांनी शिवरायांनी औरंगजेबला पाठवलेल्या तहनाम्यांची तुलना वि.दा. सावरकर यांनी अंदमानच्या सेल्युलर जेलमधून सुटका करण्यासाठी 'बिटिश सरकार'ला पाठवलेल्या माफीनाम्याशी केलीय. प्रसाद लाड यांच्या म्हणण्यानुसार, "शिवरायांचा जन्म रायगडावर झाला!" तर दुसरे 'भाजप' आमदार गोपीनाथ पडळकर यांनी "अफजलखानाने शिवरायांचा कोथळा काढला," असे अकलचे बिनडोक तारे तोडलेत! "शिवचरित्र"ची विटंबना करण्याची ही मालिका शिवरायांना "लेवा पाटीदार" करण्यापर्यंत पोहोचली आहे. हे अनवधानाने होतही असेल. परंतु, ते 'संघ–भाजप' परिवारातील नेत्यांकडूनच का होते? आणि छत्रपती शिवरायांच्या बाबतच का होते ? ह्या प्रश्नाचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

विनायक दामोदर सावरकर यांना मौर्याची सत्ता नष्ट करणारा पुष्यमित्र शुंग आणि पेशवे महान वाटले; तर "शिवाजी कसला राजा; हा तर काकतालीय (म्हणजे, कावळा बसायला आणि फांदी तुटायला) न्यायाने झालेला राजा!" असे म्हणावेसे वाटले. 'रा. स्व.संघा'चे 'बायबल' असलेल्या "विचारधन"मध्ये द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांनी संभाजीराजांना "मदिरा आणि मदिराक्षीमध्ये बरबाद झालेला छत्रपती" म्हणत, शिवरायांना 'अपात्र पिता' ठरवले आहे. जेम्स लेनच्या पुस्तकावर वाद भडकला होता, तेव्हा अटल बिहारी वाजपेयी प्रधानमंत्री होते. त्यांनी जेम्स लेनमार्फत झालेल्या विकृतीला विचार ठरवून "विचाराची लढाई विचाराने करावी; पुस्तकावर बंदी घालू नये," असा उपदेश केला होता. त्यावर शिवप्रेमींनी उद्रेक व्यक्त करताच वाजपेयींनी घुमजाव केले. अशीच वेळ प्रमोद महाजन यांच्यावर केंद्रीय मंत्री असताना आली होती. ते म्हणाले होते, "आमची सत्ता संपूर्ण देशभर आहे. शिवाजीराजांचे राज्य फक्त साडेतीन जिल्ह्यांपुरतेच होते!" मतांसाठी छत्रपती शिवरायांचे नाव घ्यायचे आणि सत्ता मिळाली की, छत्रपतींच्या चरित्राची विटंबना करायची, ही संघ संस्कारित 'भाजप'ची वृत्तीच आहे.

ह्या दुष्मनीचे मूळ शिवरायांना स्वराज्याचं स्वप्न देणाऱ्या आणि ते साकार करण्यासाठी सर्वप्रकारचे मार्गदर्शन करणाऱ्या राजमाता जिजाऊंच्या ऐतिहासिक कार्यात आहे. "विजयनगर" वंशातल्या जिजाऊंनी स्वराज्य निर्मितीच्या आड येणाऱ्या ब्राह्मण धमार्चे वर्चस्व हटवून समस्त बहुजनांचेही क्षत्रियीकरण केले. त्यामुळे साताराच्या नागेवाडीचा नागनाक महार गडरक्षक– गडकरी झाला. "होता जिवा, म्हणून वाचून शिवा,' ही म्हण तयार झाली. जिवा महाले हे नाभिक समाजातील होते. ऐतिहासिक कर्तबगारीने ते शिवरायांशी जोडले गेले. परंतु, ह्या जोडीला कुजक्या भटबुद्धीचा 'कवी योगेश' ह्याने टोपणनावानं "तांबडी माती" या चित्रपटातील गीतात घुसडलं आणि "जिवा–शिवाची बैलजोडी" करून घुमवलं. ह्याच संस्कारातून अहिल्यानगरचा 'भाजप'चा नगरसेवक श्रीपाद छिंदम याने महाराजांचा उल्लेख शिव्या देऊन केला होता. दिल्लीचा 'भाजप' नेता जय भगवान गोयल याने नरेंद्र मोदींची तुलना "आजच्या युगातले शिवाजी" अशी भलामण करून केली होती. विनोद तावडे राज्याचे 'सांस्कृतिकमंत्री' असताना शिवरायांच्या पुण्यतिथीला (२०१८) रायगडावर ढोल वाजवण्याचा उत्सव झाला.

जेम्स लेन आला आणि शिवचरित्राची नासधूस करून गेला असे झालेले नाही. इतिहासाचार्य राजवाडे, ब.मो. पुरंदरे, निनाद बेडेकर आदिंनी लेखनातून शहाजीराजांना सतत गैरहजर दाखवणे; रामदास–कोंडदेव हे 'गुरू' नसताना तसा उल्लेख करणे; कोंडदेव यास सतत शिवबा– जिजामाता भोवती दाखवणे, असे उद्योग केले आहेत. पुरंदरेंनी तर त्यापुढे उडी मारून "दादोजी, जिजामाता आणि शिवबा यांचे गोत्र एकच" अशी विकृत कल्पना शिवचरित्रात मांडलीय. त्याची चर्चा घडावी, ह्याच हेतूने देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री होताच ब.मो.पुरंदरे यांना 'महाराष्ट्रभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्याचा घाट घातला; आणि त्याला महाराष्ट्रभरातून विरोध होऊनही तो तडीस नेला. त्यामुळेच "रामदास नसते तर, छत्रपतींना कोणी विचारले नसते," अशी अवमान करणारी भाषा कोश्यारी ह्याने वापरली. याबद्दल त्यांना तेव्हा उपमुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी काही सांगावे, अशी अपेक्षा ठेवायची, तर तेही "नाशिकचे पोलीस आयुक्त छत्रपती आहेत का?" असे बोलून मोकळे झाले होते. त्यांनी असे बोलावे ; प्रसाद लाड यांनी शिवरायांचं जन्मस्थळ 'शिवनेरी'वरून रायगडाला हलवावे; गोपीनाथ पडळकरांनी अफझलखानकरवी शिवरायांचा कोथळा काढावा किंवा सी.आर. पाटील यांनी शिवरायांना "पाटीदार" करावे ; हे प्रकार अनवधानाने होण्यासारखे नाहीत. हा तर, बहुजनांचे श्रद्धास्थान असलेल्या शिवाजी महाराज, संभाजी महाराज, जिजामाता, ताराराणी, महात्मा फुले, राजर्षि शाहू, डॉ. आंबेडकर आदि महामानवांबाबत 'जोक्स' तयार करणे; त्याचा कुजबुज तंत्राद्वारे प्रचार करणाऱ्या 'संघी मानसिकता' असणाऱ्यांचा होलसेल धंदा आहे.

'संघ–भाजप'चे चालक शिवरायांचे नाव घेतात; पण प्रत्यक्षात त्यांच्या उलट विचाराचे काम करतात. त्यांना शिवाजीराजे हे मतांचे ध्रुवीकरण करणाऱ्या दंगलींसाठी आणि सामाजिक वर्चस्वासाठी पाहिजेत. शिवरायांचे शेतकरीहित, स्त्री सन्मान, सामाजिक समता, उदार धार्मिक धोरण याच्याशी त्यांचे काहीही देणे–घेणे नाही. शिवरायांची नैतिकता आणि प्रगल्भता त्यांच्यात येणे शक्य नाही. कारण त्यांची ती वृत्तीच नाही; तसा संस्कारच नाही! ह्याची साक्ष ज्ञानोबा–तुकोबांच्या मानवतावादी विचारांपेक्षा 'मनुस्मृती'ला श्रेष्ठ म्हणणारा मनोहर भिडे वरचेवर देत असतो. अशांपासून विशेषतः बहुजन– मराठा समाजाने दूर राहायला हवं. अशांना साथ देणे; म्हणजे शिवरायांची बदनामी करणार्यांना ताकद देण्यासारखे आहे. लोकशाहीची हत्या करणाऱ्यांना मदत करण्यासारखे आहे. ते टाळा. कारण –

सह्याद्रीच्या कडेकपारी,
लढले शिवराया।
हिमालयाच्या स्वातंत्र्याचा,
घडविला मूळपाया॥

**ज्ञानेश महाराव**
(ज्येष्ठ पत्रकार– संपादक)

## प्रबोधन

# रूढी मोडा, प्रगती करा

रूढिरेव बलीयसि अर्थात 'रूढीं भयंकर बलिष्ठ असतात. हे नुसतं ऐकून, होकारार्थी मान हालवून फारसं कळणार नाही; त्यासाठी अनुभव घेण्याची तयारी ठेवल्यास त्यांची राक्षसी ताकद नक्की कळेल. वटसावित्रीच्या व्रतामध्ये काही अर्थ नसतो. कारण आत्मा, यमराज, पुनर्जन्म आदि सफेद झूठ आहेत, असं लेक्चर कॉलेजात देणाऱ्या प्राध्यापिका कॉलेज सुटताच वटवृक्षाला सूत गुंडाळून फेऱ्या घालताना दिसतात. रूढी ह्या राक्षसी आहेत, हे कळतं पण त्यांच्या विळख्यातून कसं सुटावं हे मात्र कळत नाही. कळतं पण वळत नाही असा हा सारा गचाळ मेंदूचा कारभार आहे. म्हणूनच विद्वान रूढिरेव बलीयसि म्हणून माथा ठोकत गप्प बसतात.

लोकांच्या रूढिप्रियतेचं रहस्य सांगताना स्वामी विवेकानंद म्हणतात, 'प्रत्येकाच्या मेंदूत विचाररेषा असतात. पण नव्या नव्या विषयावर बोलल्याशिवाय त्या रेषा स्पष्ट होत नाहीत. ज्या विचारशील, स्पष्टवक्त्यांनी विचार करून, बोलून ह्या रेषा स्पष्ट, ठळक केल्या ते रूढीच्या कचाट्यातून सुटतात. मात्र ज्यांनी रूढींची चिकित्साच केली नाही, त्यांच्यातील दोषांवर बोलण्यासाठी तोंड उघडलं नाही, ते लोक रूढिप्रियच असतात. लोकांच्या रूढिप्रियतेचं गुपित हे असं आहे.' रूढी म्हणजे धर्म नव्हे. रूढींचं पालन केलं नाही म्हणजे काही धर्म बुडत नाही (आणि जरी धर्म बुडाला तरी काही आपण मरणार नाही.). त्याविषयीसुद्धा स्वामीजी म्हणतात, 'ज्याला आपण धर्म म्हणतो तो क्षुद्र, खुळचट रूढींमध्ये सामावलेला आहे. (उदा. वटसावित्री व्रत, शनिमहात्म्य वाचणे, गुढी उभारणे, होळी इत्यादि) स्थानिक रूढी असंख्य आहेत. पण रूढी म्हणजे खरा धर्म असं अज्ञानी लोक मानतात. ती त्यांची फार मोठी चूक असते. स्थानिक, खुळचट रूढींना वेद, स्मृती वा पुराण कुणाचाच आधार नसतो. पण अज्ञ लोक धर्म कुणाचाच आधार नसतो. पण अज्ञ लोक धर्म बुडण्याच्या भीतीपोटी त्यांचं पालन करतात. रूढींचा त्याग केल्याने चांगला माणूस होता येतं, हेही त्यांना कळत नाही. आज एखाद्या खेड्यातील क्षुल्लक रूढी ही उपनिषदाच्या उपदेशापेक्षा श्रेष्ठ मानली जात आहे. '

'पण लक्षात कोण घेतो' ही ह. ना. आपटे यांनी कादंबरी खळबळ माजवून गेली. कादंबरीची नायिका यमू ही दुष्ट शंकरमामंजींच्या केश–वपनाच्या रूढिप्रियतेची बळी झाली. त्याकाळी पतिनिधनानंतर ब्राह्मण विधवा स्त्रीचे केस काढून तिला बोडकी करीत. आज ही रूढी मोडीत निघाली म्हणून काही सनातनी ब्राह्मणांचंही घोडं कुठं अडलं नाही. संत तुकडोजी यांनी ग्रामगीतेत रूढीपालनाचा उपहास केला आहे. ते म्हणतात,

स्वये म्हणवी राम भक्त ।
नाही एकपत्नीव्रत ।
नित्य पूजितो हनुमंत।
व्यसने झाला प्रेताऐसा ॥

पाडव्यादिवशी द्युत (जुगार खेळण्याची रूढी आहे. त्याविषयी ते म्हणतात,

काही पाडवा जुगार खेळती ।
ही आहे समाजाची अधोगती ।
काही लोक जिंकोन जाती ।
काही हरती वस्त्रेही ॥

रूढी ह्या अजर, अमर, चिरंतन, सनातन नसतात. बऱ्याच जुन्या रूढी नष्ट होतात तर बऱ्याच नव्या रूढी मूळ धरतात. विवेकानंद म्हणतात, 'श्रुतींमध्ये ईश्वर, जीव इत्यादी विषयांवरील सत्ये असतात. पण स्मृतींमध्ये विशिष्ट स्थानी, विशिष्ट परिस्थितीत आचरण्याची कर्तव्यं सांगितलेली असतात आणि म्हणूनच ती कालमानानुसार बदलतात. एखादी क्षुद्र सामाजिक रूढी बदलली म्हणजे धर्म बुडत नाही. उदा. वेदकाळी गोमांस खाणाराच ब्राह्मण समजला जाई. पण कृषिविकासामुळे गाईचं महत्त्व वाढलं. कारण बैलांची पैदास तिच्याशिवाय शक्य नव्हती म्हणून ती रूढी बंद पडली. '

एकादशी करण्याची रूढी महात्मा चक्रधरांनी मोडली. ग्रंथ संस्कृत भाषेतच लिहावेत, ही रूढी ज्ञानदेवांनी मोडली. नवसांची रूढी तुकोबांनी मोडली, (नवसे कन्या–पुत्र होती, तर का करणे लागे पती? असा रोकडा प्रश्न त्यांनी विचारला.) अंत्यज पोर कडेवर घेऊन एकनाथांनी अस्पृश्यतेची रूढी मोडली. देव आणि भक्त यांच्यामध्ये भट–दलाल नको म्हणून महात्मा जोतिरावांनी रूढिभंग केला. सती प्रथा राजा राममोहन रॉय यांनी मोडीत काढली. राजर्षी शाहूंनी पुराणोक्त मंत्रांची रूढी मोडून काढली. हे सारे रूढिभंजक समाजावर अनंत उपकार करून गेले. पण समाज हा या सर्व थोरांच्या रूढीभंजक वृत्तीचे अनुकरण करतोय का? रूढिप्रिय देश चिखलात रुतलेल्या हत्तीसारखा असतो. आपणाला प्रगती करायची असेल तर रूढींच्या चिखलातून आपण शक्य तितिक्या लवकर बाहेर पडलं पाहिजे. कारण–

रूढिराक्षसींनी । किती लोक खाल्ले
किती हाल केले । काय सांगू॥१
रूढी छळतात । रूढी पिळतात
रूढी गिळतात । समाजाला ॥२
रूढी निरर्थक` अन्यायकारक
रूढी त्या मारक । भोळ्या जना ॥३
समाजहिताच्या । लावूनी कसोट्या
पहा खऱ्या–खोट्या । रूढी कशा ॥४
व्यक्तीच्या हिताला । साधक–बाधक
तारक–मारक। पाहा रूढी ॥५
अनर्थ दिसतो । ज्या ज्या रूढीमध्ये
अशा रूढीमध्ये। गुंतू नका ॥६
समाजाला मागे। नेणाऱ्या रूढींना
दूर फेकताना । नको दुःख ॥७
दुष्ट रूढींशी जो । शत्रुत्व करतो
तोच पुढे नेतो । समाजाला ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# दहा तारखेला होणाऱ्या देवा भाऊंच्या सभेकडे सोलापूरकरांचे लागले लक्ष

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जे बोलतात ते करुन दाखवतात हा प्रत्यय सोलापूरकरांना वेळोवेळी आला आहे. उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी, विमानसेवा आणि आयटी पार्क नंतर देवा भाऊ सोलापूरकरांना काय भेट देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सोलापुरात एकच चर्चा आहे ती म्हणजे दहा तारखेला हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर होणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेची.

सोलायूरच्या विकासाला नवी दिशा देण्याचे काम कुणी केले असेल तर ते राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीस यांनी. देवाभाऊ जे बोलतात ते करुन दाखवतात याचा प्रत्यय वेळोवेळी सोलापूरकरांना आला आहे. सोलापूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची हमी देवाभाऊंनी दिली आणि उजनी सोलापूर दुहेरी पाईपलाईनसाठी तब्बल 892 कोटी रुपयांचा निधी दिला. त्यामुळे सोलापूरच्या पिण्याचा पाण्याचा



प्रश्न कायमस्वरूपी संपणार आहे.

गेल्या पंधरा वषार्पासून बंद पडलेली सोलापूरची विमान सेवा सुरू करण्याचे आश्वासन देवा भाऊंनी दिले आणि ते पूर्णत्वास नेले. सोलापूर गोवा विमानसेवा सुरू झाली नंतर सोलापूर मुंबई विमान सेवा सुरू आहे. यापुढे सोलापूरहुन तिरुपती बेंगलोरु विमानसेवा सुरू करण्याचा मानस आहे. दहिटणे येथे झालेल्या कार्यक्रमात देवाभाऊंनी सोलापुरात आयटी पार्कची करण्याची घोषणा केली आणि काय, अवघ्या चार महिन्यात आयटी पार्कसाठी जागा निश्चीत होऊन काम सुरु झाले. लवकरच आयटी कंपन्यां सोलापुरात सुरु होतील आणि हजारो तरुणांना काम मिळेल.

त्यानंतर आता 10 जानेवारी रोजी हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर देवाभाऊंची सभा होणार आहे. सभेत देवाभाऊ सोलापूरकरांसाठी कोणती घोषणा करणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. देवा भाऊंनी आतापर्यंत ज्या ज्या घोषणा केल्या त्या पूर्ण केल्या. त्यामुळे सोलापूरकरांचा देवाभाऊ आणि भाजपवरील विश्वास वाढला आहे. सोलापूरकर आणि देवाभाऊ यांचे नातं दिवसेंदिवस घट्ट होत आहे.

यासाठी दुवा ठरले आहेत ते म्हणजे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे. ना. गोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून सोलापूरच्या विकासाचा नवा अध्याय सुरू केला आहे.

10 तारखेला होणाऱ्या देवाभाऊंच्या सभेसाठी जय्यत तयारी झाली असून कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. सर्वसामान्य सोलापूरकर यांना एकच आशा आहे ती म्हणजे देवाभाऊ. सोलापूरच्या विकासाचे नवे पर्व या सभेच्या निमित्ताने सुरू होणार आहे.

पान १ वरून

# सोलापूर महानगरपालिका...

खबरदारीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. डॉ. सचिन ओम्बासे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, 'मतदान प्रक्रिया ही लोकशाहीचा कणा आहे. प्रत्येक मतदाराला निर्भय वातावरणात मतदान करता यावे, यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी समन्वयाने आणि नियमांचे काटेकोर पालन करून काम करणे आवश्यक आहे.ह्यावेळी प्रशिक्षणास संबंधित विभागांचे अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय कर्मचारी, झोन अधिकारी व इतर निवडणूक कामकाजाशी संबंधित कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षणामुळे निवडणूक प्रक्रियेतील त्रुटी टाळण्यास तसेच मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यास मदत होणार आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निष्पक्ष व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व पूर्वतयारी करण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.यावेळी उपायुक्त आशिष लोकरे, निवडणूक अधिकारी–४ श्रीमती अंजली मुरोड,निवडणूक अधिकारी–५ अभिषेक देशमुख, रजाक पेंडारी आदी मान्यवर उपस्थिती होते.

## बेताल बोल

### बिनविरोध बिनशर्त

काल जवळ होते तसे
गळ्यात गळेही होते...
आपले आपलेच आहेत
असे वाटणारे सगळे होते...
बिनविरोध झाले आता
बिनशर्त जुळू लागले...
एकमेकांच्या उंबरठ्यात
प्रत्येकजण अडखळू लागले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# स्त्रीशक्तीच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्धार : सोनिया गोरे



**पोखरापूर (कटूसत्य वृत्त):-** खताळ परिवाराशी आमचे गेल्या अनेक वर्षांपासून ऋणानुबंध आहेत. कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या बळावर त्यांनी उभा केलेला व्यवसाय निश्चितच कौतुकास्पद आहे. जिथे जिथे मदतीची गरज भासेल, तिथे आम्ही कायम पाठीशी उभे राहू, असे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या पत्नी सोनिया गोरे यांनी दिले.

लांबोटी येथे जयशंकर सुपर मार्केटच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी सोनिया गोरे व राजश्री पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कामती पंचायत समिती गणातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्त्रीशक्तीचा सन्मान करण्यात आला.

क्रांतीनाना मळेगावकर यांच्या ह्यहोम मिनिस्टर' व 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मराठी व हिंदी गीतांच्या सादरीकरणावर महिलांनी ठेका धरत जल्लोष केला. सुमारे तीन ते साडेतीन हजार महिलांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

जयशंकर सुपर मार्केटचे उद्घाटन राजश्री राजन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या संयोजिका माजी पंचायत समिती सदस्या विमलताई तानाजीराजे खताळ यांच्यासह गणेश (आप्पा) खताळ, उर्मिला खताळ, कविता खताळ, अक्षय खताळ, रुद्राक्ष खताळ, अनिरुद्ध खताळ, संग्राम खताळ, धनश्री खताळ, सोनल खताळ, सोनाली खताळ, वृषाली खताळ, अहिल्या खताळ आदींसह संपूर्ण खताळ परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन गणेश (आप्पा) खताळ व अक्षय खताळ यांच्या नेतृत्वाखाली खताळ परिवाराने केले असून हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

# 'जनहित' चे मोहोळ तहसीलसमोर बेमुदत धरणे आंदोलन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील सीना व भोगावती नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीतून मोठ्या प्रमाणावर माती खरडून वाहून गेली असून, शासनाने पाच एकराचा निकष न लावता ज्या क्षेत्राचे नुकसान झाले आहे तेवढ्या क्षेत्रानुसार सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांनी मोहोळ तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.

सीना नदीकाठच्या अर्जुनसोंड, सावळेश्वर, मुंढेवाडी, नांदगाव, वडवळ, कोळेगाव, आष्टे, घाटणे, भोयरे, एकुरके, नरखेड आदी गावांतील तसेच भोगावती नदीकाठच्या वाळूज, देगाव, डिकसळ व इतर गावांतील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीतून माती वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी भयानक आर्थिक संकटात सापडला असून, शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच आष्टे व विरवडे बुद्रुक येथील शेतकरी व नागरिकांच्या घरांमध्ये पुराचे पाणी शिरून नुकसान झाले आहे. या बाधितांना नियमाप्रमाणे दहा किलो रेशन मिळाले असताना, तातडीची दहा हजार रुपयांची आर्थिक मदत अद्याप देण्यात आलेली नाही. संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने दहा हजार रुपये जमा करावेत. यासोबतच आष्टे व विरवडे बुद्रुक येथील ग्रामसेवकांची चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली. वाघोली, टाकळी, पेनूर व शेटफळ मंडलातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या, मात्र अद्याप भरपाई न मिळालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने नुकसान भरपाई जमा करावी, अशी मागणीही यावेळी प्रशासनाकडे करण्यात आली.

या धरणे आंदोलनात जिल्हाध्यक्ष नाना मोरे, जिल्हा कार्याध्यक्ष नाना रणदिवे, जिल्हा उपाध्यक्ष विजय तळेकर, बिरू वाघमोडे, गणेश चवरे, मानाजी चवरे, समाधान रणदिवे, नाना वाघमोडे, लखन घाटे, विष्णू मेलगे, सोमनाथ गावडे, बंडू गावडे, सुरवंता नरुटे, दत्तात्रय व्यवहारे, प्रमोद हावळे, नवनाथ हावळे, शाहू चौगुले यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# प्रभाग २२ मध्ये नागरिकांच्या मतांवर आधारित विकासावर भर- किसन जाधव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ मध्ये निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या प्रचारादरम्यान विकासकामांबाबत नागरिकांमध्ये सकारात्मक व विचारपूर्ण चर्चा होताना दिसत आहे. भारतीय जनता पार्टीचे उमेदवार किसन जाधव, दत्तात्रय नडगिरी, सौ. अंबिका नागेश गायकवाड व सौ. चैत्राली शिवराज गायकवाड हे पदयात्रा, घरोघरी भेटी व गाठीभेटींच्या माध्यमातून गुरुवारी धोंडीबा वस्ती रामवाडी अंबाबाई मंदिर परिसर येथील मतदारांशी थेट संवाद साधत असून त्यांच्या अपेक्षा, समस्या व सूचना जाणून घेत आहेत. याप्रसंगी राजू जाधव, दीपक जाधव लॉन्ड्री, कैलास हटकर, समीर सिकंदर शेख, अंकुश गायकवाड, फिरोज पठाण, शहानवाज कवठेकर आदींची उपस्थिती होती.

प्रभागात आतापर्यंत मूलभूत सुविधांसोबतच स्वच्छता व्यवस्थेचा दर्जा सुधारणा, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य सेवा, महिलां व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा, अंतर्गत रस्त्यांचे सुशोभीकरण तसेच सार्वजनिक जागांचे सौंदर्यीकरण यावर भर देण्यात आल्याचे नागरिक सांगत आहेत. गेल्या दोन दशकांपासून प्रभागाच्या विकासाशी संबंधित असलेल्या नागेश गायकवाड यांच्या कायार्चा वारसा यंदा सौ. अंबिका गायकवाड पुढे नेत असून त्यांच्या संपर्क मोहिमेलाही नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.आम्ही विकासाची आश्वासने देण्यापेक्षा नागरिकांना नेमका कोणता विकास हवा आहे, हे प्राधान्याने जाणून घेत आहोत. नागरिकांच्या सूचनांनुसारच पुढील काळात प्रभाग २२ च्या विकासाची दिशा ठरवली जाईल, असे मत उमेदवार किसन जाधव यांनी व्यक्त केले. यापुढील काळात प्रभागासाठी दीर्घकालीन, नियोजनबद्ध व सर्वसमावेशक विकास आराखडा राबविण्याचा मानस उमेदवारांनी व्यक्त केला आहे.

तसेच ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक संस्थापक लक्ष्मण जाधव आणि माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या नेतृत्वात ईच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी आणि सदस्य यांनी देखील प्रचारादरम्यान आपली स्वतंत्र प्रचार यंत्रणा राबवीत मतदारांपर्यंत जाऊन भाजपाच्या चारही उमेदवारांना विजयी करा असे आवाहन करीत आहेत. प्रचाराचा वेग पाहता चारही उमेदवारांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# मुंबईत इथेनॉल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडियाची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुंबई येथे इथेनॉल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (एटअ क्ल्र्म्) यांची एक महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत देशातील इथेनॉल उद्योगाची सद्यस्थिती, भविष्यातील आव्हाने आणि संधी यांचा सखोल आढावा घेण्यात आला. इथेनॉल निर्मितीपासून ते साठवणूक, वाहतूक आणि वितरण प्रक्रियेपर्यंतच्या सर्व टप्प्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान विशेषतः इथेनॉल पुरवठ्याच्या संदर्भात तेल विपणन कंपन्यांसोबत (OMCs) येणाऱ्या अडचणी, करार अंमलबजावणीतील व्यावहारिक समस्या, लॉजिस्टिक अडथळे तसेच धोरणात्मक स्पष्टतेअभावी निर्माण होणाऱ्या अडचणी यावर सदस्यांनी आपले अनुभव मांडले. या समस्यांवर सकारात्मक आणि परिणामकारक उपाययोजना सुचवण्यात आल्या असून, त्या संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय असोसिएशनने घेतला आहे.

असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष या नात्याने बैठकीस उपस्थित राहून सदस्य उत्पादकांचे प्रत्यक्ष अनुभव, अडचणी आणि सूचना ऐकण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. उद्योगाशी संबंधित निर्णय घेताना सदस्यांचे मत महत्त्वाचे असून, अशा बैठका संघटनात्मक बळ वाढविण्यास उपयुक्त ठरतात, असेही त्यांनी नमूद केले. या बैठकीस असोसिएशनचे सर्व संचालक आणि देशभरातील इथेनॉल उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सक्रिय सहभाग समाधानकारक असून, यामुळे इथेनॉल उद्योगाच्या भविष्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे चित्र दिसून आले.

इथेनॉल उद्योग अधिक मजबूत करणे, शेतकऱ्यांना त्यांच्या कच्च्या मालाला योग्य दर मिळवून देणे आणि देशाच्या ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने ठोस योगदान देणे, या त्रिसूत्रीवर असोसिएशन कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार यावेळी करण्यात आला. केंद्र सरकारच्या इथेनॉल मिश्रण धोरणाला यशस्वी करण्यासाठी उद्योग, शेतकरी आणि शासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्याची गरज असल्याचे मतही बैठकीत व्यक्त झाले. एकूणच, ही बैठक इथेनॉल क्षेत्रातील धोरणात्मक दिशा ठरविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली असून, आगामी काळात असोसिएशनच्या माध्यमातून ठोस पावले उचलली जातील, असा विश्वास सदस्यांनी व्यक्त केला.

## नावात बदल

माझे जुने नाव शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार हसीना अ सत्तार शेख असे होते व आयकर विभागाच्या पॅन कार्डवर माझ्या वडिलांचे नाव सत्तार शेख असे आहे परंतु मी माझे नवीन नाव हसीना रफिक मुलाणी असे केले आहे तरी मला आजपासून माझ्या नवीन नावाने ओळखावे.

## नावात बदल

माझ्या आईचे नाव अनुराधा रमेश गायकवाड असे होते ते बदलून माझ्या आईचे नवीन नाव अनिता रमेश गायकवाड असे केले आहे तरी माझ्या आईचे नवीन नावाने ओळखावे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं. ५२७/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो,यांचे समोर**

नुरजहाँ जायोद्दीन मोमीन वय २३ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी नगरपरिषद मोहोळ, मोहोळ, यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार म्हणजेच नूरजहाँ जायोद्दीन मोमीन हिचा जन्म ता. १०/१२/२००२ रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार म्हणजेच नूरजहाँ जायोद्दीन मोमीन हिची जन्म दाखल्याची ता.१०/१२/२००२ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे डिसेंबर २००२ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच नूरजहाँ जायोद्दीन मोमीन हिची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२३/०१/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे.ता.०८/०१/ २०२६.

**लिपीक** (शिक्का) **हुकुमावरुन**

# नगराध्यक्ष पदगृहण व उपनगराध्यक्ष, स्वीकृत सदस्य निवड 12 जानेवारीला होणार

## उपनगराध्यक्ष निवडीतही राहणार भाजपचे वर्चस्व



**अक्कलकोट, (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाचा अधिकृत पदगृहण सोहळा, विशेष सभा तसेच उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडीचा कार्यक्रम येत्या १२ जानेवारी रोजी पार पडणार आहे. स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या दिवशी नगर परिषदेतील महत्त्वाच्या निवडी होणार आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या अक्कलकोट नगर परिषदेच्या निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने घवघवीत यश संपादन केले आहे.

या निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले असून, नगर परिषदेत पक्षाचे वर्चस्व अधोरेखित झाले आहे. या निवडणुकीत मिलन कल्याणशेट्टी यांची थेट जनतेतून नगराध्यक्षपदी निवड झाली आहे.

एकूण २५ नगरसेवकांपैकी तब्बल २२ सदस्य भाजपचे निवडून आले असून, केवळ तीन जागा विरोधी गटाला मिळाल्या आहेत. भाजपकडे बहुसंख्य सदस्यसंख्या असल्याने नगर परिषदेतील निर्णय प्रक्रियेवर पक्षाचे वर्चस्व राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

बहुमताच्या जोरावर भाजपला तीन स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार मिळणार आहे. त्यामुळे नगर परिषदेत भाजपची संख्या आणखी वाढणार असून, प्रशासकीय आणि विकासकामांच्या दृष्टीने पक्षाला अधिक बळ मिळणार आहे.

दरम्यान, या होणाऱ्या विशेष सभेत मिलन कल्याणशेट्टी हे अधिकृतरित्या नगराध्यक्ष पदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. त्याच सभेत उपनगराध्यक्ष पदाची निवड प्रक्रिया देखील पार पडणार असून, या पदावरही भाजपचाच उमेदवार निवडून येणार आहे.

एकुणच अक्कलकोट नगर परिषदेत भाजपचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले असून, आगामी काळात शहराच्या विकासकामांना वेग मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर यांचे कार्यालय,**

**पत्ता-सिंचन सेवा भावन,गुरूनानक चौकजवळ, ऑफिसर्स क्लब समोर, सोलापूर पिन-४१३००३**

**ई-मेल-** eesid@ymail.com. **दूरध्वनी क्र.- ०२१७-२७४०६६३**

**ई-निविदा सूचना क्र. ३३ सन २०२४ २०२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.


**कामाचे नाव :-** दहिगांव उपसा सिंचन योजना ता.करमाळा अंतर्गत टप्पा क्र. २ मधील मुख्य कालवा सा.क्र.१०/७४० ते ११/०६० चे मातीकाम व बांधकाम तसेच अस्तरीकरण करणे.

**जिल्हा :-** सोलापूर
**निविदेची किंमत रुपये :-** रु. १३५.८८ लक्ष
**ई-निविदा उपलब्ध कालावधं :-** दिनांक ०९/०१/२३२६ ते दिनांक १६/१/२०२६
**ई-निविदा उघडण्याचा दिनांक** १९/०१/२०२६
जा.क्र. सोपावि/लेशा/निविदा/ २१ /२०२६.
दि. ०२/०१/२०२६
**कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर** यांचे कार्यालय

**सही/- (स.कुं. पवार)**
**कार्यकारी अभियंता,**
**सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर**

डीजीआयपीआर-आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी५०७३

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 147

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# मधला मारुती व बुधवार पेठेतील धार्मिकस्थळांचे सुशोभीकरण करणार- सुशील बंदपट्टे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेच्या प्रभाग क्र. ४ मधील मधला मारुती, बाळीवेस, बुधवार पेठ परिसरातील धार्मिकस्थळांचे सुशोभीकरण करण्यात येणार असून, भक्तांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे उमेदवार सुशील बंदपट्टे यांनी मंगळवारी दिली. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. ४ मधील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या उमेदवारांनी मंगळवारी बुधवार पेठ व परिसरात पदयात्रा काढली. या पदयात्रेत सुशील बंदपट्टे यांच्यासह उमेदवार कविता आनंद चंदनशिवे, सारिका फुटाणे,



विश्वनाथ बिडवे तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना सुशील बंदपट्टे म्हणाले, प्रभागात मधला मारुती, उत्तरमुखी व दक्षिणमुखी मारुती मंदिरे, शिवगंगा देवी मंदिर, लक्ष्मीनारायण मंदिर यासह अनेक धार्मिकस्थळे आहेत.

या ठिकाणी भाविक मोठ्या श्रद्धेने पूजा-अर्चा करतात. मात्र, या मंदिरांच्या सुशोभीकरणाकडे आतापर्यंत दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे महापालिका, जिल्हा नियोजन समिती तसेच विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून या ठिकाणी विकासकामे करण्याचा प्रयत्न केला जाईल. ही कामे करताना स्थानिक भक्त, नागरिक व सामाजिक संस्थांना विश्वासात घेतले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच या भागातील आरोग्य व शैक्षणिक सुविधांचा प्रश्न कायमच चर्चेत असून, त्यावर ठोस उपाययोजना केल्या जातील, असा शब्दही त्यांनी दिला. पदयात्रेदरम्यान विविध ठिकाणी उमेदवारांचे जंगी स्वागत करण्यात आले.

अनेक कार्यकर्ते व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सफाई कामगारांना पक्की घरे देणारच - कविता चंदनशिवे यावेळी उमेदवार कविता आनंद चंदनशिवे म्हणाल्या की, महापालिकेच्या सफाई कामगारांची वसाहत जीर्ण झाली असून, त्यांना पक्की घरे मिळालीच पाहिजेत. यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल. बागले वस्ती, मुकुंदनगर, राजीव गांधीनगर परिसरात रमाई आवास योजना राबविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज नियोजनाचे मंत्री गोरे यांचेकडून कौतुक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)** :जिल्हा परिषदेत आज राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची कामाचा आढावा घेऊन नियोजन व अंमलबजावणीचे कौतुक केले.



सोलापूर जिल्हा परिषदेत आज ग्रामविकास विभागाचे कामकाज व मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचे कामाचा आढावा घेतला. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, उप मुख्य कार्यकारी अमोल जाधव, यांचे सह अभियान कक्षातील कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी मुख्यमंत्री समृध्द अभियाना विविध घटकांचा आढावा घेतला. सध्या जिल्ह्यात राज्य स्तरावरून विविध सेलिब्रिटी, किर्तनकार यांचे प्रभावी कार्यक्रमाच्या अंमलबजावणी बाबत आढावा घेतला. सध्या समाज माध्यमांवर सोलापूर जिल्हा परिषदेचे उप सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाच्या कामाचे नियोजनाचा आढावा घेऊन समाज माध्यमाचा प्रभावी वापर केले बद्दल कौतुक केले. अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी जिल्ह्यात राबविणेत असलेले उपक्रमाची माहिती दिली. या अभियानासाठी समाज माध्यमाचा प्रभावी वापर व ग्रामपंचायती मध्ये सुरू असलेले कामाचे प्रेझेंटेशन उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांचे सह विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी प्रत्येक गावास भेट देऊन मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचे कामांना गती देत असल्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सांगितले. करसंकलनात उत्कृष्ठ कामे केलेले ग्रामपंचायती, लेखा परिक्षण अहवालाचे शक पुर्तता अभियान, अकोला व गोपाळपूर येथील किर्तनकार कार्यक्रम, ५५ गावात अतिरिक्त ५ ग्रामसेवक कामकाज पाहणे साठी देणेत आले असल्याचे अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी सांगितले.

कक्षातील जनसंपर्क अधिकारी सचिन जाधव, अधिक्षक सुहास चेळेकर, कक्ष अधिकारी सिध्दाराम बोरूटे, अक्षय स्वामी, अधिक्षक आप्पा भोसले, अभिनव पायंडे उपस्थित होते.

# भर कोर्टात जीवे मारण्याची धमकी करजगीवर कारवाई व जामीन रद्द करण्याची डॉ. आडके यांची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)** :- सोलापुरातील बहुचर्चित १३७ एकर जुनी मिल भूखंड घोटाळ्यातील प्रमुख आरोपी कुमार शंकर करजगी यांनी धमार्दाय आयुक्त कार्यालयात भर कोर्टात अर्जदार व सामाजिक कार्यकर्ते डॉ. संदीप आडके यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी घडली असून, यामुळे कोर्ट परिसरात एकच खळबळ उडाली होती.



प्राप्त माहितीनुसार, कुमार करजगी हे जुनी मिल बेकार कामगार, वारसदार आणि जनहित संघर्ष समिती ट्रस्टच्या कामानिमित्त धमार्दाय आयुक्त कार्यालयात उपस्थित होते. यावेळी अर्जदार व सदर ट्रस्टचे सचिव असलेल्या डॉ. संदीप आडके यांना त्यांनी अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. हा प्रकार भर कोर्टात घडल्याने तात्काळ पोलिसांना पाचारण करण्यात आले.

कुमार करजगी हे डिसेंबर २०१७ पासून जुनी मिल भूखंड घोटाळ्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या सशर्त जामिनावर बाहेर आहेत. जामिनाच्या अटींचा भंग केल्याप्रकरणी डॉ. संदीप आडके यांनी यापूर्वीच त्यांचा जामीन रद्द व्हावा यासाठी उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. त्यानंतर दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने जामिनाच्या अटी शिथिल न करता, पोलीस आयुक्तालय व न्यायालयात नियमित हजेरी, संबंधित जागेचे कोणतेही व्यवहार न करणे तसेच कोणावरही दबाव न टाकण्याच्या स्पष्ट अटी घातल्या होत्या.

विशेष बाब म्हणजे, यापूर्वी जामिनाच्या अटी मोडल्याची कबुली स्वतः कुमार करजगी यांनी न्यायालयात शपथपत्राद्वारे दिली होती आणि यापुढे अशा प्रकारचे कृत्य करणार नाही, अशी हमीही दिली होती. असे असतानाही भर कोर्टात जीवे मारण्याची धमकी देणे हे थेट न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन असल्याचा आरोप डॉ. आडके यांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर डॉ. संदीप आडके यांनी सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्याकडे लेखी तक्रार करून कुमार करजगी यांचा जामीन तात्काळ रद्द करून त्यांना कारागृहात पाठवावे, अशी ठाम मागणी केली आहे. तसेच आज कुमार करजगी पोलीस मुख्यालयात संबंधित प्रकरणात हजेरी लावण्यासाठी आले असताना, हा गंभीर प्रकार त्यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) राजन माने यांच्या निदर्शनासही आणून दिला आहे.

भर न्यायालयात झालेल्या या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रकरणात पोलीस प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दादा फाउंडेशनच्या गेट बंद आंदोलनाला यश

## मागण्या मान्य झाल्याने आंदोलन मागे; अन्यथा MSEB कार्यालयावर तीव्र आंदोलनाचा इशारा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त)** : दादा फाउंडेशनच्या वतीने आज मोहोळ येथील एमएसईबी (महावितरण) कार्यालयासमोर करण्यात आलेले बेमुदत गेट बंद आंदोलन, प्रशासनाने शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या मान्य केल्यामुळे यशस्वी ठरले. गोफणे डीपीसह इतर डीपी तात्काळ सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय झाल्याने आंदोलन मागे घेण्यात आले, अशी माहिती दादा फाउंडेशनच्या अध्यक्ष विकास जाधव यांनी दिली.



मौजे लांबोटी (ता. मोहोळ) येथील गोफणे डीपी, खरात डीपी व जाधव डीपी यांची कामे अनेक वेळा पाठपुरावा करूनही पूर्ण न झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला होता. यासंदर्भात महावितरण प्रशासनाकडे वारंवार तक्रारी, प्रत्यक्ष भेटी तसेच स्थानिक आमदारांचे पत्र देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला.

सीना नदीला आलेल्या महापुराला चार महिने उलटून गेले असून, या पुरामध्ये अनेक शेतकऱ्यांचे संसार आणि उभी पिके वाहून गेली. या संकटातून सावरण्याचा प्रयत्न करत असतानाच, शेतीसाठी अत्यावश्यक असलेली वीजपुरवठ्याची कामे रखडल्याने शेतकरी अडचणीत सापडले होते. उरलेली थोडीफार पिके वाचावीत, यासाठी शेतकरी महावितरण कार्यालयाच्या चकरा मारत होते; मात्र त्यांच्या प्रश्नांकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला.

'एसी कार्यालयात बसून शेतकऱ्यांची वेदना समजून घेतली जात नाही. प्रशासनाने वेळेत लक्ष दिले असते, तर डीपीचे काम केव्हाच पूर्ण झाले असते,' अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती. यामुळेच गुरुवार, दि. ८ जानेवारी २०२६ रोजी शासकीय वेळेत मोहोळ येथील टरएइ कार्यालयावर गेट बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात, आंदोलनादरम्यान किंवा त्यानंतर शेतकऱ्यांचे काहीही बरेवाईट झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण प्रशासन व शासनावर राहील, असा ठाम इशाराही देण्यात आला होता.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या**

मौजे लांबोटी येथील गोफणे डीपी, खरात डीपी व जाधव डीपीस आवश्यक तार, लंग्ज व वायर कनेक्शन करून त्या तात्काळ कार्यान्वित कराव्यात. भगीरथ पाणीपुरवठा योजनेत लांबोटी गावाचा समावेश असला तरी जाधव वस्ती ते जुनी लांबोटी गाव अद्याप जोडलेले नसल्याने हा भाग तात्काळ योजनेत समाविष्ट करून पाणीपुरवठा सुरू करावा.

अखेर दादा फाउंडेशनच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या गेट बंद आंदोलनामुळे महावितरण प्रशासनाने मागण्यांची दखल घेत सकारात्मक निर्णय दिल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. मात्र, दिलेल्या आश्वासनांची तातडीने अंमलबजावणी न झाल्यास आंदोलन पुन्हा तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

या अंदोलनात विकास भारत जाधव, मोहन मधूकर खताळ, विलास राजेंद्र शिंदे, मल्लाप्पा आप्पाराव जाधव, विठ्ठल बजरंग करे, कुमार लक्ष्मण चटे, नामदेव शंकर गोफणे, रामचंद्र विठ्ठल चटे, नितिन चंदनशिवे, सोमनाथ चंदनशिवे, सजेर्राव पाटील, यशवंत खरात, महादेव चटे, पोपट गाढवे, प्रविण गुंड, बंडू पाटील व जगन्नाथ मुळे यांच्यासह मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते.

# जनतेच्या विश्वासावरच सामाजिक कार्य जोमाने- शरद मोरे



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** आम्ही चुकीचे वागत नाही, आपणही चुकीचे वागू नका. प्रामाणिक काम करा यश मिळेल. शिवप्रसाद फाउंडेशनच्या माध्यमातून सात हजार लोकांना आरोग्य व इतर सोयी सुविधांचा लाभ मिळाला. जनतेच्या विश्वासावरच सामाजिक कार्य अधिक जोमाने करत राहीन, असे प्रतिपादन शिवप्रसाद उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष शरद मोरे यांनी केले.शिवप्रसाद उद्योग समुहाचे अध्यक्ष शरद मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवप्रसाद उद्योग समुहाच्या वतीने दहिगाव येथे नियोजन बैठकीचे आयोजिन करण्यात आले होती, यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवप्रसाद उद्योग समूहातील वेगवेगळ्या उद्योगांची माहिती देण्यात आली. यामध्ये शिवप्रसाद फूडस ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, शिवप्रसाद इन्फ्रा इंडस्ट्रीज, प्रथमेश मिल्क प्रोसेसिंग, एस.पी.जी. मल्टीस्टेट, प्रमोटर्स ॲण्ड डेव्हलपर्स, शिवप्रसाद व्हेंचर्स, मुकुंद फुडस ॲण्ड मिल्क प्राॅडक्टस, शिवप्रसाद कॅटल फिड, शिवप्रसाद फाउंडेशन, शरद (बापू) मोरे मोटार वाहतूक संस्था, नमोः इटेबल्स, शिवप्रसाद अर्बन, एस.पी.जी. इन्शुरन्स असेल या सर्व योजनांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.शेतका यांकडून मिळालेल्या दुधाचे कोणकोणते व कशाप्रकारे उत्पादने तयार होतात. एस.पी.जी. मल्टीस्टेट, एस.पी.जी. इन्शुरन्सचा फायदा काय, शेतक यांसाठी कर्ज सुविधा, शिवप्रसाद फाउंडेशनमधून देण्यात येणारी आरोग्य सेवा याबद्दल माहिती देण्यात आली. यावेळी शरद मोरे यांनी नेहमीच शेतकरी, दूध उत्पादक व कष्टकरी वगासाठी केलेल्या कायाची उपस्थितांनी प्रशंसा केली. यावेळी बैठकीस शिवप्रसाद दूध संघाचे सर्व सेंटर चालक, दूध उत्पादक, शेतकरी तसेच वाहन चालक-मालक, सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील विविध भागातून आलेले मान्यवर उपस्थित होते.

# प्रभाग १५ क मधून गाडेकरांचा प्रचार जोरात राष्ट्रवादीच्या घड्याळाकडून उमेदवारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)** : सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १५ क मधील राजकीय वातावरण तापू लागले असून, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) कडून घड्याळ या निवडणूक चिन्हावर गाडेकर महेश बजरंग यांनी उमेदवारी दाखल केली आहे. सामाजिक कार्याच्या जोरावर आणि अभ्यासपूर्ण मांडणीमुळे त्यांचा प्रचार वेग घेत असल्याचे चित्र दिसत आहे. माळकरी कुटुंबातून आलेले, निर्व्यसनी व तत्वनिष्ठ सामाजिक कार्यकर्ते म्हणून गाडेकर महेश बजरंग यांची ओळख आहे. सत्तेसाठी नव्हे, तर समाजहितासाठी आणि लोकशाही अधिक भक्कम करण्यासाठी निवडणूक लढवत असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. 'सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता' या प्रवृत्तीला छेद देण्यासाठी सामान्य नागरिकांचा सक्षम पर्याय म्हणून ते निवडणूक रिंगणात उतरल्याचे त्यांच्या समर्थकांकडून नमूद करण्यात येत आहे.



प्रभाग १५ मधील विविध सार्वजनिक प्रश्नांवर त्यांनी यापूर्वी सक्रिय भूमिका घेतली आहे. सिद्धेश्वर यात्रेतील धूळप्रदूषण, स्वच्छता व आपत्कालीन रस्त्याच्या प्रश्नावर त्यांनी न्यायालयीन लढा दिला होता. तसेच पार्क चौकाचे नामकरण महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व भैय्या चौकाचे नामकरण लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक करून तेथे स्वच्छता व सुशोभीकरणाची कामे झाल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांनी सांगितले.

कोरोना महामारीच्या काळात बाधित रुग्णांची माहिती जाहीर करण्यासंदर्भात त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याची जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) दखल घेतल्याचा उल्लेखही प्रचारादरम्यान करण्यात येत आहे. कायद्याचा अभ्यास, सामाजिक प्रश्नांची जाण आणि कष्टकरी वर्गाबद्दलची संवेदनशीलता ही त्यांची वैशिष्ट्ये असल्याचे मत समर्थक व्यक्त करत आहेत. निवडणूक प्रचारात मतदारांना जात, धर्म व पंथ न पाहता सामाजिक कायार्चा विचार करून मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जागरूक व सुज्ञ मतदारांनी योग्य उमेदवाराची निवड करावी, असा संदेश प्रचारातून देण्यात येत आहे. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत होणार आहे. प्रभाग १५ क मधील ही लढत लक्षवेधी ठरण्याची शक्यता असून, मतदार कोणाच्या बाजूने कौल देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रभाग २२ मध्ये भाजप उमेदवारांची रामवाडीतील गैबीपीर नगरात पदयात्रा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २२ मधील भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार किसन जाधव, दत्तात्रय नडगिरी, सौ. अंबिका नागेश गायकवाड व सौ. चैत्राली शिवराज गायकवाड यांच्या प्रचाराला मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र सध्या प्रभागात दिसून येत आहे. याच अनुषंगाने बुधवारी रामवाडी परिसरातील गैबीपीर नगर व लगतच्या भागात पदयात्रा व मतदार संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेत महिलांसह मुस्लिम समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती दिसून आली, ज्यामुळे सामाजिक एकतेचा सकारात्मक संदेश नागरिकांपर्यंत पोहोचला.



माजी नगरसेवक नागेश गायकवाड तसेच लक्ष्मण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही पदयात्रा पार पडली. प्रशासन राजवटीच्या काळात नागरिकांना भेडसावलेल्या विविध अडचणी, मूलभूत सुविधांतील त्रुटी तसेच त्या सोडवण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा यावेळी मतदारांशी संवाद साधत मांडण्यात आला. आमदार देवेंद्र कोठे यांच्या माध्यमातून तसेच महायुती सरकारच्या सहकायार्तून प्रभाग २२ साठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध झाल्याने रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आदी कामांना गती मिळाल्याचेही सांगण्यात आले.

पुढील काळात आरोग्य सुविधा बळकट करणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान, बालगोपालांसाठी चिल्ड्रन पार्क तसेच स्वच्छता विषयक भरीव कामे करण्याचा मानस किसन जाधव यांनी व्यक्त केला. लाडक्या बहिणी योजनेअंतर्गत महिलांना भविष्यात अधिक लाभ मिळावा, यासाठी शासन दरबारी प्राधान्याने पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. विकासाच्या जोरावर पुन्हा एकदा प्रभाग २२ चे नेतृत्व करण्याची संधी द्यावी व मतदानाच्या रूपाने आमच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, असे आवाहनही यावेळी किसन जाधव यांनी मतदारांना केले. या पदयात्रेमुळे विकास, सामाजिक सलोखा आणि विश्वासाचे वातावरण अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.

# आर्या स्कूलच्या मेघश्री गुंडची राज्यस्तरीय टेबल सॉकर स्पर्धेसाठी निवड

**माढा (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचलनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय,जिल्हा क्रीडा परिषद व टेबल सॉकर असोसिएशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अरण ता.माढा येथे बुधवारी 7 जानेवारी रोजी घेण्यात आलेल्या पुणे विभागीय शालेय स्पर्धेत विठ्ठलवाडी येथील रहिवासी व माढा येथील आर्या पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता आठवीत शिकत असलेली मेघश्री राजेंद्रकुमार गुंड हिने उत्कृष्ट व चमकदार कामगिरीच्या जोरावर प्रथम क्रमांकासह राज्यस्तरीय टेबल सॉकर स्पर्धेसाठी मजल मारली आहे.याबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.



मेघश्री गुंड हिने प्रयत्न,जिद्द, चिकाटी,भरपूर सराव व योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर 19 वर्षे वयोगटात टेबल सॉकर स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत ही उल्लेखनीय व उत्तुंग कामगिरी केली आहे.तिला आर्या पब्लिक स्कूलचे क्रिडाशिक्षक शुभम पूरवत यांचे मार्गदर्शन लाभले आहे.ती विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांची मुलगी आहे.तिचे अभिनंदन संस्थेचे मार्गदर्शक जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, प्राचार्य सागर थोरात, आदर्श मुख्याध्यापक बाळू गुंड, चेअरमन अनिलकुमार अनभुले, अशोक चव्हाण, हनुमंत उबाळे, अरुण मोरे, डॉ. किशोर गव्हाणे, डॉ.मोहन शेगर, डॉ.संतोष कदम, डॉ.नेताजी कोकाटे, महावीर बरकडे, शिवाजी कदम, सोमनाथ खरात, अंकुश डूचाळ, सुधीर गुंड, संभाजी पाटील, अमित चव्हाण, नेताजी उबाळे, सौदागर गव्हाणे, राजाभाऊ कदम, सुहास शिंगाडे, सतीश गुंड, धनाजी सस्ते, समाधान कोकाटे, गोरखनाथ शेगर, दिनेश गुंड, कैलास सस्ते,सौदागर खरात, ब्रम्हदेव शिंगाडे,सुधाकर गव्हाणे,गणेश नागटिळक, भिवाजी जाधव, सज्जन मुळे,सागर मोरे,अशोक जाधव, विकास खैरे यांच्यासह ग्रामस्थ व शिक्षकांनी यांनी केले.

# उमेदवारांनी प्रभागातील प्रत्येक घर पिंजून काढून म.न.पा.वर राष्ट्रवादीचा झेंडा फडकवावा - भरणे

**सोलापूर ( कटूसत्य वृत्त)** :- सोलापुरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांनी कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता आपल्या प्रभागात फिरून प्रत्येक घर पिंजून काढावे.सोलापूर महानगरपालिकेवर आपलाच झेंडा फडकणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.



सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस भवनात सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीला सामोरे जात असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीप्रसंगी ते बोलत होते.

सोलापूर महानगरपालिकेच्या अंतर्गत विविध विकास कामांसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह आपण स्वतः पालकमंत्री असताना कोट्यवधी रुपयांची कामे केली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केलेली कामे मतदारांच्या घरोघरी पोहचवा. यामुळे विजयाला मोठा हातभार लागणार आहे.कोण काय म्हणतय याकडे दुर्लक्ष करा प्रचार आणि अपप्रचाराला बळी न पडता प्रभागात राहून निवडणूक जिंकण्याच्या उद्देशाने अहोरात्र काम करा,असेही संपर्कमंत्री भरणे यावेळी बोलताना म्हणाले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर - जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान,ज्येष्ठ नेते चंद्रकांत दायमा,तौफिक शेख, हेमंत चौधरी, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले यांच्यासह राष्ट्रवादीचे अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या वतीने पत्रकारांचा सन्मान

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळीनगर येथील दि सासवड माळी शुगर फॅक्टरी या कारखान्याच्या वतीने सालाबाद प्रमाणे, कारखाना गेस्ट हाऊस येथे आचार्य बाळशास्त्री जांभेकर जन्मदिवस व मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने, माळशिरस तालुक्यातील पत्रकारांचा सत्कार,सन्मान,आणि स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



गेल्या पंचवीस वषार्पेक्षाही जास्त काळापासून सासवड माळी शुगर फॅक्टरी दरवर्षी पत्रकार दिन साजरा करत आला आहे.तसेच या कार्यक्रमात माळीनगर पत्रकार संघाच्या नूतन अध्यक्षपदी रितेश पांढरे व सचिवपदी गोपाळ लावंड यांची निवड झाल्याबद्दल कारखान्याचे वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी दि सासवड माळी शुगर फॅक्टरीचे चेअरमन राजेंद्र गिरमे,मॅनेजिंग डायरेक्टर गणेश इनामके,संचालक राहुल गिरमे, विशाल जाधव,शुगरकेन सोसायटीचे चेअरमन अमोल ताम्हाणे,दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अजय गिरमे, महात्मा फुले पतसंस्थेचे व्हा. चेअरमन महादेवराव एकतपूरे आदी मान्यवर उपस्थित होते तर या कारखान्याचे माहिती व जनसंपर्क अधिकारी अनिल बनकर यांनी कार्यक्रमाची चोख व्यवस्था केली होती.यावेळी माळशिरस तालुक्यातील दैनिक,साप्ताहिक, पाक्षिक,मासिक तसेच विविध वृत्तवाहिनीचे व यू ट्यूब चॅनलचे प्रतिनिधी, पत्रकार बंधू भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.यावेळी चेअरमन राजेंद्र गिरमे,मॅनेजिंग डायरेक्टर गणेश इनामके तसेच ॲड अविनाश काले यांनी विविध विषयांवर आपले मनोगत व्यक्त करून पत्रकारांशी सुसंवाद साधला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार गणेश करडे यांनी केले तर आभार पत्रकार निनाद पाटील यांनी मानले.